फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ६७/२०२६
पो. स्टे. माजलगांव शहर गु.र.नं १७/२०२६
भा.ना.सु.सं. कलम ५०३ प्रमाणे.
CNR No.MHBI09000409-2026

## निशाणी १ खालील आदेश

अर्जदार आलीम उस्मान खुरेशी यांने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता चे कलम ५०३ नुसार जप्त इंडिया यामहा मोटार प्रा.लि. कंपनीची यामहा एफ झेड १६ मोटार सायकल जिचा पासिंग क्र. एम.एच.०२ बी के.६२७३, चेसीस क्र. ME121C01Y82015094 व इंजिन क्र.21C1015428 त्यांच्या ताब्यात मिळणेकामी दाखल केला आहे. अर्जदाराचे कथन की सदरची मोटार सायकल ही तपासादरम्यान पोलिसांनी अर्जदाराच्या ताब्यातून जप्त केली आहे. सदरची मोटार सायकल तिचे मालकीची आहे. ती जप्त असल्याने पोलिस ठाण्यात पडून आहे. त्यामुळे सदर वाहनामध्ये तांत्रिक बिघाड निर्माण होवू शकतो. सदरची मोटार सायकल अर्जदाराच्या वापराकामी आवश्यक आहे. करिता अर्जदाराने विनंती केली की अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. सरकारी वकील म्हणणे मांडले की, जप्त मोटार सायकल ही पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वाची असून अर्जदारच्या ताब्यात सदर मोटारसायकल दिल्यास ती कोणास विक्री किंवा त्यामध्ये बदल करू शकते व परत गुन्हयात वापरण्याची दाट शक्यता आहे. म्हणून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. तसेच तपास अधिकारी यांनी सदरची मोटार सायकल अर्जदारास परत केल्यास तपासाकामी पो.स्टे.ला हजर राहणार नाहीत त्यामुळे अर्जदाराचे ताब्यात देण्यास हरकत नोंदवली आहे.

३. अभिलेखावरून असे दिसते की, अर्जदाराचे ताब्यातून सदरची मोटार सायकल घटनास्थळावरून जप्त करण्यात आली आहे. अभिलेखात नि.क्र.०३ सोबत दाखल केलेल्या आर.सी. बुकची पाहणी केली असता अर्जदार ही जप्त मोटार सायकलची मालक असल्याचे दिसुन येते. अर्जदाराने तिचे अर्जातील कथनाच्या पुष्टयर्थ

नि.क्र.०३ सोबत इन्श्युरन्स तसेच नि.०३ सोबत आधारकार्ड, आ.सी बुक तसेच स्वत :चे प्रतिज्ञापत्र इ.पडताळणी केलेल्या प्रती सादर केले आहेत. शिवाय, अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही मोटार सायकलचा ताबा मागितलेला नाही. सदरची मोटार सायकल पोलीस ठाण्यामध्ये तशीच पडून राहिल्यास त्यामध्ये तांत्रिक बिघाड होवू शकतो. करिता काही अटी लावून सदर मोटार सायकलचा ताबा अर्जदारास देणे न्यायोचीत ठरते. करिता, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आदेश

(१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) जप्त असलेली इंडिया यामहा मोटार प्रा.लि. कंपनीची यामहा एफ झेड १६ मोटार सायकल जिचा पासिंग क्र. एम.एच.०२ बी के.६२७३, चेसीस क्र. ME121C01Y82015094 व इंजिन क्र.21C1015428 ही अर्जदार आलीम उस्मान खुरेशी रा. ईदगाह मोहल्ला, माजलगाव. जि.बीड हीस रूपये ६०,०००/— (अक्षरी साठ हजार रूपये फक्त) इतक्या रक्कमेच्या हानिरक्षण बंधपत्राद्वारे देण्यात यावी.

(३) सदरची मोटार सायकल अर्जदाराचे ताब्यात देताना तिच्या पुढच्या आणि मागच्या बाजूंची छायाचित्रे घेण्यात यावेत व त्यासंदर्भातील पंचनामा तयार करण्यात यावा.

(४) सदर मोटार सायकल अर्जदार यांनी न्यायालयाच्या आदेशाशिवाय विक्री करू नये व त्याचे मूळ स्वरूपात बदल करू नये अगर नष्ट करू नये व न्यायालयाने आदेश दिल्यास तात्काळ हजर करावी.

(५) प्रस्तूत आदेशाची एक प्रत ही संबंधित गुन्हा नोंद क्रमांक १७/२०२६ च्या कागदपत्रांमध्ये जोडण्यात यावी.

RAHUL BALBHIM POL
Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2026.03.23 11:12:29 +0530

माजलगाव. (आर.बी.पोळ)
दिनांक १८/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१,
माजलगाव.